Impact Factor 2. 147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III | ISSUE-XII | Dec. | 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# महिला सबलिकरण आणि आर्थिक विकास

**प्रा. डॉ. सुरेश वसंतराव खोंड**
अर्थशास्त्र विभागप्रमुख
शरदचंद्र महाविद्यालय, शिराढोण
ता. कळंब जि. उस्मााबाद.

**प्रस्तावना:-**

आज आपण एकविसाव्या शतकात वावरत असतांना प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत असतांना दिसतात. पुरुषांपेक्षा योग्य रीतीने जबाबदाऱ्या स्विकारतांना दिसतात. पूर्वीसारख या क्षेत्रात फक्त पुरुषच काम करु शकतात. अशी परीस्थिती आज तहावयास मिळत नाही. अगदी सिमेवर जाऊन देशाच रक्षण सक्षमपणे करण्यातही महिला मागे राहिलेल्या नाहीत. पोलीस दल असेल किंवा कृषी, औद्योगिक क्षेत्रातही स्त्रियांचा वाटाही मोलाचा राहिलेला आहे. असे असले तरी भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे आजही महिलांना म्हणाव्या तितक्या संधी उपलब्ध झालेल्या नाहित. काही बोटावर मोजण्याइतक्या स्त्रिया सोडल्या तर, बहुतांश स्त्रियांना आजही घराबाहेर पडतांना सोबत आपल्या घरातील आई, वडील, बहिण, भाऊ किंवा आपल्या घरातील कोणीतरी सोबत न्याव लागत. हे दुर्दैवी आहे आणि यामध्ये कुठेतरी बदल होणे आवश्यक आहे. आजही टी. व्ही. वरचे कोणतेही चॅनेल सुरु केले तर महिलांवरील अन्याय अत्याचार आपणास पहावयास मिळतात. वर्तमानपत्रातही बऱ्याचशा बातम्या ह्या स्त्रियांवरील अन्याय अत्याचारावरच्याच वाचायला मिळतात. त्यामुळे आज भारतीय स्त्री ही एकीकडे प्रगती करत असलेली दिसते तर दुसरीकडे देशाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्ष झाली असली तरी स्त्रियांच्या स्वातंत्र्यात व सुरक्षेत फारसा बदल झालेला दिसून येत नाही. म्हणून आजची स्त्री ही सशक्त झाली पाहिजे ती सबल झाली पाहिजे. तरच देशाच्या आर्थिक विकासात स्त्रियांचा वाटा मोलाचा असल्याचा आपणास पहावयास मिळेल.

स्त्रियांचा पुरातन इतिहास अभ्यासल्यास आपणास असे दिसून येते की, पूर्वी स्त्रियांना मनाचे स्थान होते, स्त्रियांना घरची लक्ष्मी गनले जायचे. स्त्रियांची पूजा केली जायची असे असले तरी त्यांना फारसे अधिकार मात्र देण्यात आलेले नव्हते. समाजातील अनिष्ट चालीरीती, रुढी, परंपरा, कुटूंबातील संस्कार, इ. कारणांमुळे स्त्रियांवर स्त्रियांवर अन्यायच होत आलेला आहे. आज जरी घटनेने ३३ टक्के आरक्षण या महिलांना दिलेले असले तरी बऱ्याचवळा या आरक्षणाची अंम्मलबजावनी होतांना दिसत नाही. काही केळा स्त्रियांना या आरक्षणमुळे ग्रामपातळीवर सरपंच केले जाते मात्र एकदा का निवड झाली की बहुतांश ठिकाणी सरपंचाचे अधिकार पुरुषच वापरत असल्याचे दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:-**

१) महिला सबलिकरणाच्या व्याख्या अभ्यासने.
२) महिला सबलिकरणात महिला बचत गटाच्या सहभागाचा अभ्यास करणे.
३) महिलांचे अर्थव्यवस्थेतील स्थान अभ्यासने.

**संशोधन पध्दती:-**

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीयक साधनसामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. यामध्ये ग्रंथ, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, तसेच इंटरनेटवरील माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**महिला सबलिकरणाच्या व्याख्या:-**

**१)** महीलांवर येणारे संकट मानसिक, शरीरिक, आर्थिक या सामोरे जाऊन त्यातुन स्वत:च विकास करणे त्याचबरोबर पुरुषांबराबर चालण्याची शक्ती निर्माण करणे म्हणजे महिला सबलिकरण होय.

२) कायदे व कल्याण कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक, राजकीय व शारीरिक अशा सर्व क्षेत्रामध्ये महिलांना हक्क प्रदान करुन त्यांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करणे विकासासाठी संधी उपलब्द करुन देणे, त्यायोगे स्त्री-पुरुष असमानता कमी करणे, या प्रक्रियेला महिला सबलिकरण असे म्हणतात.

३) महिलांच्या मनात आत्मविश्वास, आपल्या अधिकाराच्या प्रती जागृत तसेच अन्यायाशी लढण्याची नैतिक ताकद व क्षमता प्राप्त होते. जेनेकरुन आपल्यावर होणाऱ्या आर्थिक, सामाजिक तसेच पारंपारिक भेदभवांना ओळखुन त्यांचा प्रतिकार करणे अशी महिला तयार करणे म्हणजे महिला सवलिकरण होय.

४) महिलांना पुरुषांबरोबरीने सामाजिक, आर्थिक व राजकीय हक्क मिळवून देणे म्हणजेच महिला सबलिकरण होय.

- **महिला बचत गट:-**

महिला सबलिकरणासाठी आणि महिलांच्या प्रगतीसाठी आज अनेक स्वयंसेवी संस्था पुढे आलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर महिलांच्या विकासासाठी विविध शासकीय योजना बँकेमार्फत राबवल्या जात आहेत. या योजनेमुळे महिलांच्या सबलिकरणास हातभार लागला आहे. अलिकडे आर्थिक विकासाचा, उन्नतीचा, समृध्दीचा, गरीबी निर्मुलनाचा एक महामंत्र म्हणून या बचत गटाकडे पाहिले जात आहे. या अशाप्रकारच्या बचत गटाची सुरुवात ही बांग्लादेशात डॉ. मुहम्मद युनूस यांच्यामुळे झाला. बांगलादेशातील चितगाव विद्यापीठात डॉ. मुहम्मद युनूस हे अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या संदर्भात गरीबी निर्मुलनाचा हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. या विचारातुनच बचत गटाची संकल्पना उदयास आली. अशाप्रकारच्या महिला बचत गटामुळे महिलांना रोजगराच्या संधी उपलब्ध होऊ लागल्या. त्यांना रोजगारासाठी दुसऱ्यांच्या दारी जाण्याची वेळ राहिली नाही. या गटाच्या माध्यमातून त्यांना भांडवल मिळू लागले. या भांडवलाच्या आधारे त्या आपल्या लहाणसहान उद्योग उभारु शकल्या. याचा देशाच्या आर्थिक विकासालाही फायदा होऊ लागला.

अलिकडच्या काळात बचत गटाचे प्रमाण महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात आढळले आहे. सद्यस्थितीत महाराष्ट्रात सुवर्ण जयंती ग्रामस्वयंरोजगार योजनेच्या अंतर्गत २,६७,००० बचत गट आहेत. त्यापैकी २,२३,००० पेक्षा जास्त बचत गट हे महिलांचे आहेत. यावरुन बचत गटाचा महिलांच्या आर्थिक विकासात किती सहभाग आहे हे लक्षात येते. अशाप्रकारच्या महिला बचत गटामुळे प्रामुख्याने ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाल्याचे दिसून येते. आर्थिक दृष्ट्या दूर्बल असणाऱ्या महिलांनी एकत्रीत येऊन बचत गट सुरु केले व त्यामार्फत अनेक लहाण मोठे लघु व कुटीर उद्योग या बचत गटाच्या मार्फत सुरु केले. यामध्ये प्रामुख्याने पुढील व्यवसाय व उद्योगांचा समावेश होतो.

१. **सामुहिक शेती:-**ग्रामीण भागात ज्या महिलांच्या शेतीचे आकारमाण लहाण आहे अशा महिला एत्रीत येऊन गटाची स्थापना करतात व समुहिक शेती करतात. यामध्ये प्रामुख्याने फळबागा, भाजीपाला अशा पिकांवर जास्त भर दिला जातो. गटङ्चिंय सभारदांच्या शेतीचे एकत्रिकरण केले जाते व शेती कसली जाते. मिळणारा नफा सर्व सभासदांमध्ये विभागून घेतला जातो.

२. **लोणचे व पापड:-**लोणचे व पापड तयार करण्याचे उद्योगही बचत गटाच्या मार्फत चालवले जातात. अलिकडे लोकांना तयार पॅकींगमधले पदार्थ खाण्याच्या सवयी वाढत आहेत. त्यामुळेच अंबा, लिंबू, मिरची, इ. प्राकारचे लोणचे तयार करुण बाजारात विक्रीसाठी येत आहेत. तांदळ, उडीद, राजगीरा, इ. सारखे पापडही अशाप्रकारच्या बचत गटामार्फत तयार करुन बाजारात विक्री केली जात आहेत. याचेच उदाहरण द्यायचे असेल तर लिज्जत पापड हा उद्योग मुळात गुजरातमध्ये एका बचत गटाच्या माध्यमातूनच सुरु झाला होता.

३. **गृहउद्योग:-** महिला घरी बसल्या बसल्या काही उद्योग करतात. यामध्ये शेवया, कुरुड्या, घरगुती मसाले, काळे तिखट, तसेच लसुण अद्रकची पेष्ट करुनही विक्री केली जाते. यामुळे महिलांना रोजगारासाठी कोणाच्या दारात फिरायची गरज भासत नाही. आणि त्यांच्या हाताला घरबसल्या कामही मिळते.

४. **फिरते उद्योग:-**शहरामधल्या बऱ्याच स्त्रिया नौकरी करतात, त्यामुळे त्यांना घरी येऊन घरचे काम करण्यास पुरेसा वळ मिळत नाही. शहरी भागातील काही महिला बचत गटांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या निवडून त्या घरपोच करतात. किराणा सामान, दुध, यासारखे साहित्य घरपोच करण्याचे कामही बचत गटाकडून केले जाते.

५. **मेणबत्ती तयार करणे:-**या व्यवसायासाठी जास्त भाडवलाची व जागेचीही गरज नसते. तसेच फार मोठ्या प्रशिक्षणाचीही आवश्यमता नसते. म्हणून बचत गटाच्या माध्यमातुन काही महिला एकत्रीत येऊन मुणबत्ती तयार करण्याचा उद्योग सुरु करतात व तयार झालेल्या मेणबत्त्या बाजारात विक्री करतात.

६. **प्रक्रिया उद्योग:-** शेतीमधुन पिकणाऱ्या फळांवर व भाजीपाल्यांवर प्रक्रिया करण्याचा उद्योगही महिला बचत गटांमार्फत केला जातो. करण प्रत्येक मोसमात सर्वच प्राकारच्या भाज्या व फळे लोकांना मिळत नाहीत. त्यामुळे ज्या मोसमात त्या उपलब्द असतात तेव्हा त्यांच्यावर प्रक्रिया करुन ते सर्वच मोसमात उपलब्द करुण दिल्या जातात. यामध्ये प्रामुख्याने लोणचे, मुरब्बा, सॉस, जेली, इ. यामधूनही महिलांच्या आर्थिकतेत वाढ होते.

७. **इतर उद्योग:-**यामध्ये बचत गटामार्फत अनेक लहाण उद्योग चालवले जातात. यामध्ये आगरबत्ती, पुजेचे साहित्य, दोरवाती, फुलवाती, आकाश कंदील, हस्तकलेचे उद्योग, नक्षिकाम, लग्नातल्या अक्षदा, दिपावळीच्या मोसमात वेगवेगळे फराळाचे पदार्थ इ. व्यवसायही महिला बचत गटाच्या माध्यमातुन चालवले जातात.

अशाप्रकारे महिला बचत गटामुळे महिलांच्या आर्थिकतेत वाढ झालेली दिसून येते. आर्थिकदृष्ट्या दूर्बल महिलांच्या जिवनात महिला बचत गट हा खुप मोठा आधार असल्याचे दिसून येते.

- **महिलांचे अर्थव्यवस्थेतील स्थान:-**

**१) आर्थिक स्थान:-**

महिलांना आर्थिक स्तरावर फारसे महत्वाचे स्थान नसल्याचे दिसून येते. बऱ्याचशा महिलांना घरकाम सांभाळून नौकरी करावी लागते. अशाप्रकारच्या दुहेरी कामामुळे महिलांच्या ताणतनावात वाढ होते. तिची फरपट उडते असे असले तरी तीचा पगार तिच्या मनाप्रमाणे खर्च करण्याचा अधिकारही तिला नसतो. महिन्याला आपला पगार पतीच्या हातीच द्यावा लागतो. तसेच तिच्या नावावर मालमत्ताही फारशी नसते. यावरुन असे अदसून येते की महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन काम करत असतांनाही ती आज आर्थिक दृष्ट्या परावलंबी असल्याचेच दिसून येते.

**२) राजकीय स्थान:-**

राजकारणात स्त्रियांना सहभाग फारसा मिळत नाही. घटनेने स्त्रियांना ३३ टक्के अरक्षण दिलेले आहे. मात्र केवळ सत्ता मिळविण्यासाठी या आरक्षणाचा बऱ्याचवेळा पुरुषच उपयोग करत असल्याचे महावयास मिळते. गावपातळीवर महिलांना आरक्षणाच्या आधारावर सरपंच केले जाते खरे, मात्र सत्ता भोगणारा त्या स्त्रिचा पती किंवा नातेवाईक असतो. सर्व निर्णय हे महिलांऐवजी पुरुषच घेत असतात.

**३) संविधानिक स्थान:-**

महिलांना कायद्याने अनेक सवलती देण्यात आलेल्या आहेत. मात्र याची स्त्रियांना जाणीव नसते. भारतीय राज्यघटनेने पुरुषांपेक्षा स्त्रियांना अधिक अधिकार देऊनही जास्तीत जास्त अधिकरी पुरुषच उपभोगत असल्याचे चित्र दिसून येते. स्त्रियां मात्र अन्यायाला बळी पडत असतात. परित्यक्ता, विधवा, स्त्रियांना कमालीचा त्रास सहण करावा लागतो. अवहेलना सहन करावी लागते.

**४) सामाजिक स्थान:-**

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती असल्यामुळे भारतीय समाजात स्त्रियांना नेहमी दुय्यम स्थान मिळालेले आहे. पुरातनकाळापासून स्त्रियांना केवळ पुजनिय स्थान देण्यात आलेले आहे. त्यांना स्वातंत्र्य देण्यात आलेले नाही. रुढी परेपरामध्ये स्त्रियांना जखडून ठेवण्यात आलेले आहे. त्यांच्यावर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या टाकण्यात आलेल्या आहेत. तिला घरामध्येच गुंतऊन ठेवण्यात आलेले आहे. तिला स्वत:चे प्रश्न सोडवण्याची क्षमता असूनही स्वतंत्र्य देणत येत नाही.

**५) आरोग्यविषयक स्थान:-**

स्त्रियांच्या आरोग्याकडे नेहमी दूर्लक्ष केले जाते. अनेकवेळा त्यांना उपाशी राहावे लागते किंवा शीळे अन्न खावे लागते. त्यामुळे महिला नेहमी साथींच्या रोगांना बळी पडतात. स्त्रिया आजारी पडल्यावर अनेकदा त्यांना दवाखान्यातही नेले जात नाही. कधी कधी त्या स्वत:ही आजार अंगावर घालतात.

- **सारांश:-**

आपल्या देशास स्वातंत्र्य मिळून अनेक वर्ष झाली असली तरी महिला ह्या आजही स्वावलंबी झालेल्या नाहीत. सरकार या महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी योजना आखत आहे मात्र या योजना व सवलती ह्या केवळ कागदावरच राबवल्या जातांना दिसून येतात. महिला बचत गटांच्या द्वारे काही महिला आपल्या स्वत:च्या पायावर उभा राहत आहेत. त्यांना आणखी स्वातंत्र्य देऊन प्रोत्साहन देण्याची गरज आहे.तरच देशाची प्रगती, आर्थिक विकास झपाट्याने होईल.

**संदर्भ सूची:-**

१) आत्मभान ते सबलिकरण एक प्रवास - अरुधती पाटील.
२) महिला सबलिकरण समस्या आणि उपाय - रेखा हिंगोले.
३) मानवी हक्क व समाज - नंदकुमार भारंबे.
४) ग्रामीण विकास सिध्दांत एवं प्रबंध - कटार सिंह.
५) कुरुक्षेत्र - स्वयंसह्यता समुह अंक जुलै २०१३.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com